SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
'A' Re-accrediated by NAAC (2014)With CGPA-3.16
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/३४४२ दिनांक : २९-१०-२०१५.

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(अभियांत्रिकी व औषधनिर्माणाशास्त्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालये वगळून)

विषय :- सुधारित समरीवरुन प्रश्नपत्रिका तपासणेबाबत.

महोदय/महोदया,

बी.ए.,बी.कॉम., बी.एस्सी., बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस. इत्यादी अभ्यासक्रमाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २६ ऑक्टोबर, २०१५ पासून सुरु झालेल्या आहेत. सदर परीक्षेची समरी महाविद्यालयाच्या लॉगइन मध्ये उपलब्ध आहे तसेच प्रश्नपत्रिकांचा पहिला लॉट आपल्या महाविद्यालयास पोहच झालेला आहे. तथापि प्रत्यक्ष परीक्षा सुरु झालेनंतर दूर शिक्षण विभागाच्या व नियमित अभ्यासक्रमाच्या काही विषयांच्या प्रश्नपत्रिका मिळाल्या नसल्याचे दूरध्वनी परीक्षा विभागामध्ये आलेले आहेत.

मार्च/एप्रिल, २०१५ मध्ये झालेल्या परीक्षेतील निकालामधील काही तांत्रिक अडचणीमुळे काही विद्यार्थ्यांचे प्रलंबीत असलेले निकाल त्रुटीदुरुस्त होवून निकाल जाहिर होत आहेत त्यामुळे ऑक्टोबर, २०१५ मध्ये होणा-या त्यांच्या पुढील सत्राच्या परीक्षेस बसण्याची संधी त्यांना प्राप्त होत आहे त्यामुळे असे विद्यार्थी समरीमध्ये वाढण्याची शक्यता आहे.

सध्या पहिला लॉटच्या प्रश्नपत्रिका पाठविण्यात आलेल्या आहेत, तरी आज अखेर तयार झालेली सुधारित समरी (अपडेट समरी) काढून घ्यावी व पुढील लॉट मध्ये प्राप्त झालेल्या प्रश्नपत्रिका सुधारित समरीवरुन तपासाव्यात व यामध्ये एखादया विषयाच्या प्रश्नपत्रिका प्राप्त न झाल्यास त्या विद्यापीठातून वेळीच घेवून जाण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव